## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २७६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०५/२०१८

**१) अज्ञात रुग्णवाही गाडी चालकांच्या निष्काळजीपणे एकाचा मृत्यु :—**

दिनांक २८/०५/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील मृतक प्रभाकर माधवराव साखरपुरे वय ६२ वर्ष, रा. विद्यानगर भंडारा हे एनएच ६ रोडने चोले हॉस्पीटल समोर बस मधुन उतरुन रोड क्रॉस करुन घरी जात असतांना यातील अज्ञात रुग्णवाहीकेच्या आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपने चालवुन मृतकास धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी दिलीप श्रीरामजी सामृग्रे वय ५४ वर्ष, रा. गणेशपुर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) चारचाकी वाहन चालकाने मोटार सायकल चालकाला धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २८/०५/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी देवराम नारायन निखारे वय ४५ वर्ष, रा. मोहाडी हा स्वत:चे एनएच ३६ एम ५०५६ ने मोहाडी वरुन आंधळगाव ला येत असता डोंगरगाव जवळ यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन दारुचे नशेत भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मोटार सायकलला धडक मारुन फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४,१८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**३) महिलेस अश्लिल शिवीगाळ करुन जिवाने ठार मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २७/०५/२०१८ चे १८.०० ते २८/०५/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी यांचे घर एकमेकांचे शेजारी असुन आरोपी हा फिर्यादीस नेहमी शिवीगाळ करतो यातील फिर्यादीची नातीन आराध्या ही अंगणात खेळत असतांना तिला तु ऐवढे सामानाचे गाठोडे घेवुन तु कुठे चालली! असे म्हणाल्या वरुन तेव्हा आरोपी हा घरातुन गल्लीत येवुन अश्लिल शिवीगाळ करुन जिवाने ठार मारण्याची धमकी देवुन ढकलुन दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,३२३,५०९,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. हेमने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २८/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण २१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी — ०३, ईतर वाहनांवरती — १८ केसेस करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म. रा.)

२९/५/१८
(डी.डब्ल्यु मंडलवार)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**दुरध्वनी क्र.८८८८९६०५६०**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**: संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.